**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,**

**(** महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )

प्रशासकीय भवन, 4 था मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - 400 071.

दूरध्वनी 022-2529 9685 ई-मेल : mdmsobcfdc@gmail.com

वेबसाईट - www.msobcfdc.org CIN - U74999MH1999SGC119586


दिनांक : 26.05.2022.

## स्वारस्य – अभिव्यक्ती (Expression of Interest)

"महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळा" मार्फत महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याकरीता इच्छुक असलेल्या व Skill India Portal (SMART) द्वारे मान्यता घेतलेल्या व संलग्न असलेल्या केवळ महाराष्ट्र राज्यातील Training Partners (TP) यांचेकडून सन 2022-23 तसेच सन 2023-24 या दोन आर्थिक वर्षाकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. Training Partners (TP) यांनी जिल्हानिहाय Skill Gap Analysis नुसार काम करण्यासाठी तयारी असल्याचा संमती अर्ज दिनांक 02 जून, 2022 पर्यंत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, प्रशासकीय भवन, 4था मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई – 400 071 या पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष कार्यालयात किंवा महामंडळाच्या homsobcfdc@gmail.com या ईमेल आय.डी. वर सादर करावेत. विहित कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. अर्ज सादर करण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

**अटी व शर्ती :-**

1. संस्थेने अर्ज व आवश्यक ती सहपत्रे पृष्ठांकित करुन सादर करणे आवश्यक आहेत.
2. Training Partners (TP) यांनी Skill India Portal (SMART) द्वारे मान्यता व संलग्नता घेतलेली असावी.
3. केवळ 3 ते 5 मानांकन असलेल्या Training centres (TC) द्वारेच लाभार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देता येईल.
4. एका Training Partners (TP) यांचे किमान पाच Training Centers (TC) असतील.
5. अर्जासोबत सेक्टर व कोर्सनिहाय Training Centers (TC) ची Urban Local Body (URB) निहाय यादी जोडणे आवश्यक राहील.
6. Training Partners (TP) यांची वार्षिक उलाढाल (Turnover) किमान एक कोटी इतकी असावी.
7. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक इमाव2021/प्र.क्र.78/महामंडळे, दि.21 फेब्रुवारी, 2022 अन्वये Training Partner (TP) / Training Centres (TC) यांना कौशल्य विकास प्रशिक्षण राबविणेबाबत दिलेल्या सूचना बंधनकारक असतील.
8. Training Partners (TP) यांना अन्य शासकीय योजनेत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचा किमान दोन वर्षांचा अनुभव असावा व संस्थेने किमान 70% प्रशिक्षणार्थींना रोजगार उपलब्ध करुन दिलेला असावा.

9. कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी Training Partners (TP) यांनी कंपनी / संस्था /प्लेसमेंट एजन्सी यांचे समवेत टाय-अप केलेले असावे. याबाबतचे पत्र  अथवा LOI ची प्रत पुरावा म्हणून अर्जासोबत सादर करावी.

10. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या किमान 70% प्रशिक्षणार्थींना किमान वेतनानुसार रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

11. संबंधित Sector Skill Council (SSC) कडून प्रमाणित झालेले प्रशिक्षक प्रशिक्षण देण्यासाठी असणे बंधनकारक असतील.

12. Training Partners (TP)ची निवड ही सन 2022-23 तसेच सन 2023-24 या दोन आर्थिक वर्षाकरीता असेल. Training Partners (TP) ची कामगिरी, उपलब्ध निधी यांचा विचार करुन कालावधी वाढविण्याचा निर्णय महामंडळाद्वारे घेण्यात येईल.

13. संस्थेद्वारे महामंडळाची कौशल्य विकास प्रशिक्षण योजना अधिक गतीमान होण्याकरीता, लक्षीत गटास प्रशिक्षणाकरीता प्रवृत्त करण्याकरीता तसेच योजनेच्या जन जागृतीकरीता वापरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीचा तपशील अर्जात थोडक्यात नमूद करावा.

14. अर्जात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने संबंधित कागदपत्रे सादर करावेत.

15. अर्जात दिलेली माहिती व सादर केलेली कागदपत्रे यांच्यात तफावत अथवा चुकीची माहिती आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

16. प्राप्त झालेल्या अर्जाची शासन निर्णयातील निकषांनुसार महामंडळाच्या मुख्यालयातील समितीकडून छाननी करण्यात येईल.

17. PAN क्रमांक आवश्यक आहे.

18. एका जिल्ह्यातून एकाच प्रशिक्षण विषयाशी संबंधित समान मानांकन (स्टार रेटिंग) असलेल्या एकापेक्षा जास्त संस्थांकडून अर्ज प्राप्त झाल्यास,

    अ. संस्थेकडे असलेल्या प्रशिक्षणाच्या सोयी सुविधा
    आ. संस्थेची Online App द्वारे संपूर्ण पडताळणी
    इ. संस्थेकडील साधन सामुग्री
    ई. उच्च अर्हताप्राप्त प्रशिक्षक,
    उ. अद्ययावत सोई-सुविधा व प्रसाधन गृहासह संस्थेची इमारत
    ऊ. त्रयस्थ संस्थांमार्फत प्रशिक्षण संस्थेचा तपासणी अहवाल
    ऋ. संबंधीत जिल्हयातील जिल्हा व्यवस्थापकांकडून प्राप्त झालेला छाननी अहवाल, इत्यादी निकषांची तुलना करुन संस्थेचा प्राधान्यक्रम ठरवून संस्थेस प्रशिक्षणाचे कार्यादेश देण्यात येतील.

19. कोणत्याही कारणाशिवाय एखादा अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क महामंडळ राखून ठेवत आहे. महामंडळाचा निर्णय हा अंतिम असेल व संस्थेस बंधनकारक असेल.

20. संस्थेने सादर केलेला स्वारस्य-अभिव्यक्ती (EOI) ची वैधता विहीत नमुन्यातील EOI सादर करण्याच्या अंतिम दिनांकापासून 90 दिवस इतकी असेल.  90 दिवसांपेक्षा कमी वैधता नमूद केलेल्या संस्थांचे अर्ज रद्द समजण्यात येतील.

21. महामंडळ एखाद्या संस्थेच्या छाननी दरम्यान अपात्र ठरवू शकेल, जर :-

अ. EOI अर्ज विहित नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर केला नसल्यास,

आ. संस्थेचा राज्य/ केंद्र शासन / केंद्रशासित राज्य अथवा राज्य महामंडळाद्वारे काळ्या यादीत समावेश केला असल्यास

इ. भारतातील कोणत्याही शासकीय संस्थेसोबत न्यायालयीन विवाद असल्यास

22. Earnest Money Deposit (EMD) (सुरक्षा ठेव रक्कम) :-

अ. अर्जासोबत संस्थेने रु.50,000/- इतकी रक्कम महामंडळाकडे EMD रक्कम म्हणून NEFT / RTGS द्वारे जमा करणे आवश्यक आहे.

ब. EMD ची रक्कम महामंडळाच्या ICICI बँक, शाखा – बॅकबे रिक्लेमेशन,मुंबई येथील खाते क्रमांक - 039305007235, IFSC - ICIC0000393 मध्ये जमा करावी व त्याबाबतची पावती / चलान ची प्रत अर्जासोबत जोडावी.

क. महामंडळाकडे जमा असलेल्या EMD रक्कमेवर कोणतेही व्याज अदा केले जाणार नाही.

ड. EMD ची रक्कम अपात्र संस्थेस महामंडळाद्वारे परत करण्यात येईल. तसेच, पात्र संस्थेच्या EMD ची रक्कम EOI चा कालावधी पूर्ण झाल्यावर महामंडाळाद्वारा परत करण्यात येईल.

23. अर्ज सादर करण्याबाबतचे वेळापत्रक -

| अ.क्र. | तपशील | दिनांक / वेळ |
|---|---|---|
| 1. | महामंडाळाच्या वेबसाईटवर अर्जाचा विहित नमुना व अटी व शर्ती ची उपलब्धता | दि.26.05.2022, सकाळी 11:00 नंतर |
| 2. | संमती अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.02.06.2022, सायंकाळी 6:00 वाजेपर्यंत. |

**<u>टिप :-</u>** प्राप्त पर्यायातून संस्थेची निवड करण्याचे अधिकार सर्वस्वी महामंडळाचे असतील. तसेच आवश्यकतेनुसार अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा अधिकार पूर्णत: महामंडळाचा असेल.

**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय**
**वित्त आणि विकास महामंडळ मर्या.**

*******